# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. ०३ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १३४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा राम मंदिर ट्रस्टचे पहिले सीईओ नियुक्त

**नवी दिल्ली :** प्रशासकीय कामकाज अधिक मजबूत आणि सुव्यवस्थित करण्यासाठी, श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची आपल्या पहिल्या पूर्णवेळ मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पदावर नियुक्ती केली आहे. मंदिर व्यवस्थापनाला बळकटी देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. नुकत्याच समोर आलेल्या निधी व्यवस्थापनाच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर ट्रस्टने आपले प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक आणि मजबूत करण्याचे ठरवले आहे.

## केदारनाथ हेलिकॉप्टर सेवेसाठी सात सप्टेंबरपासून बुकिंग विंडो

**डेहराडून :** चारधाम यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यात केदारनाथ धामला जाणाऱ्या भाविकांसाठी हेलिकॉप्टर सेवा १५ सप्टेंबरपासून पुन्हा सुरू होणार आहे. उत्तराखंड नागरी उड्डाण विकास प्राधिकरणाने (यूसीएडीए) यासाठी तयारी वेगाने सुरू केली असून, पहिली तिकीट बुकिंग विंडो ७ सप्टेंबरपासून उघडण्याची तयारी आहे. यूसीएडीएच्या माहितीनुसार, तिकिटांचा काळाबाजार रोखण्यासाठी आणि बुकिंग व्यवस्था सुव्यवस्थित करण्यासाठी दुसऱ्या टप्प्यात १५-१५ दिवसांच्या कालावधीसाठी टप्प्याटप्प्याने तिकिटे उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

# समृद्धी महामार्गावर सोनसाखळी लुटणाऱ्या टोळीला तीन दिवसांत बेड्या

## दिल्ली, नाशिक आणि बीडमधून पाच आरोपी जेरबंद; 20 हून अधिक गुन्हे दाखल असलेला सराईत आरोपीही ताब्यात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** समृद्धी महामार्गावर वाहन अडवून चालकाच्या गळ्यातील सुमारे दीड लाख रुपये किमतीची सोन्याची चैन लुटणाऱ्या टोळीतील पाच आरोपींना छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी अवघ्या तीन दिवसांत दिल्ली, नाशिक आणि बीड येथून जेरबंद केले. या कारवाईत गुन्ह्यात वापरण्यात आलेली काळ्या रंगाची एक्सयूव्ही-७०० गाडीही पोलिसांनी ताब्यात घेतली आहे.

दि. २६ ऑगस्ट रोजी समृद्धी महामार्गावरील एक्झिट क्रमांक १८, हडसपिंपळगावजवळ राहुरी, जि. अहिल्यानगर येथील फिर्यादी आपल्या वाहनातून जात असताना अज्ञात आरोपींनी त्यांचे वाहन अडवले. फिर्यादीने वाहनाची काच खाली करताच आरोपींनी त्यांच्या कानशिलात मारून गळ्यातील सुमारे दीड लाख रुपये किमतीची सोन्याची चैन जबरदस्तीने काढून नेली. याप्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५५९/२०२६, कलम ३१०(२) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे



शाखा आणि वैजापूर पोलिसांनी समांतर तपास सुरू केला. २९ ऑगस्ट रोजी किरण अजिनाथ गायकवाड (२५, रा. हिवरसिंगा, ता. शिरूर कासार, जि. बीड) याला रायमोहा येथून ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे परशुराम मोहन गायकवाड (२६, रा. एकनाथवाडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) आणि करण भरत जाधव (२२, रा. मिडसावंगी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ह.मु. बीड) यांना दिल्लीतील प्रसादनगर परिसरातून ताब्यात घेण्यात आले.

दरम्यान, अनिल जयराम जाधव (रा. नाईकनगर, बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर) याला गुन्ह्यात वापरलेल्या एक्सयूव्ही-७०० वाहनासह नाशिक जिल्ह्यातील येवला येथून, तर पंडीत उर्फ चन्नाअप्पा सखाराम लष्करे (रा. सैनिक विद्यालय परिसर, बीड) याला बीड शहरातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.

यातील परशुराम मोहन गायकवाड हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर शहर व ग्रामीण, बीड, पुणे, बुलढाणा, धाराशिव, नाशिक आणि जळगाव जिल्ह्यांत २० पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. तसेच बीड जिल्ह्यात त्याच्याविरुद्ध एमपीडीए कायद्यान्वये करण्यात आलेल्या कारवाईत तो फरार होता.

ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश भा. जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक विनय सोनवणे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखा, वैजापूर पोलीस ठाणे, सायबर पोलीस ठाणे आणि तांत्रिक विश्लेषण विभागाच्या पथकाने केली. उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

## थोडक्यात वार्ता

### त्रिमूर्ती चौकात कोयत्याने प्राणघातक हल्ला; आरोपीला ठोकल्या बेड्या



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** त्रिमूर्ती चौकात किरकोळ कारणावरून एका व्यक्तीवर धारदार कोयत्याने जीवघेणा हल्ला करणाऱ्या आरोपीला जवाहरनगर पोलिसांनी शिताफीने अटक केली. रोहन दुर्गादास गवळी (वय ३३, रा. शांतीनिकेतन कॉलनी, छत्रपती संभाजीनगर, मूळ रा. मेसखेडा, ता. मंठा, जि. जालना) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. दि. २५ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे १० वाजता फिर्यादी अरुण उत्तम जोगदंडे (वय ३९, रा. बौद्धनगर, जवाहर कॉलनी) हे जेवण करून त्रिमूर्ती चौकातील मित्र अरुण काथार यांच्या राखीच्या हातगाडीवर बोलत बसले होते. यावेळी रोहन गवळी हा अचानक त्यांच्या मागे आला. त्याच्या हातात कोयता असल्याचे दिसताच जोगदंडे यांनी मागे वळून पाहिले. कोणतेही कारण नसताना आरोपीने जिवे मारण्याच्या उद्देशाने त्यांच्या मानेवर कोयत्याने वार केला.

### एस.टी. महामंडळाच्या एनसीएमसी स्मार्ट कार्ड केंद्रातील ऑपरेटर अटकेत

**छत्रपती संभाजीनगर :** एस.टी. महामंडळाच्या एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी निर्धारित शुल्कापेक्षा जादा रक्कम मागून लाच स्वीकारणाऱ्या गंगापूर येथील एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरण केंद्रातील ऑपरेटरवर छत्रपती संभाजीनगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मंगळवारी (१ सप्टेंबर) कारवाई केली. भारत यशवंत राऊत(वय ३५), ऑपरेटर, एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरण केंद्र, एम.टी. बसस्थानक, गंगापूर याला पंचांसमक्ष लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. एसीबीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, तक्रारदार आपल्या पत्नी, मुलगी व बहिणींसाठी एस.टी. महामंडळाच्या प्रवासाकरिता एनसीएमसी स्मार्ट कार्ड काढण्यासाठी गंगापूर येथील केंद्रात गेले होते. शासनाच्या नियमानुसार एका कार्डसाठी १९९ रुपये शुल्क असताना आरोपी ऑपरेटरने प्रतिकार्ड २५० रुपये, म्हणजे चार कार्डांसाठी एकूण १ हजार रुपये मागितले. यामध्ये निर्धारित शुल्कापेक्षा २०४ रुपये जादा रक्कम लाच म्हणून मागण्यात आल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली.

### 58 लाख कुणबी नोंदींचा डेटा सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सुपूर्द

**मुंबई :** मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मराठा आरक्षणाबाबत आतापर्यंत केलेल्या प्रशासकीय कार्यवाहीची सविस्तर आकडेवारी बुधवारी जाहीर केली. मराठवाड्यात सुमारे साडेतीन लाख प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली असून, ५८ लाख नोंदींचा डेटा डिजिटल स्वरूपात जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती सरकारच्या शिष्टमंडळाने पत्रकार परिषदेत दिली. तसेच १० ते १७ सप्टेंबरदरम्यान 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' राबवून पात्र नागरिकांच्या अर्जांची प्रक्रिया गतीने पूर्ण केली जाणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि मंत्री उदय सामंत यांनी ही भूमिका मांडली. यावेळी देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळातील गायकवाड आयोग आणि त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या १० टक्के एसईबीसी आरक्षणाचा उल्लेख करण्यात आला.

# आक्रमक मनपा कर्मचाऱ्यांनी केला महापालिकेसमोर रस्ता रोको

## मनपा कर्मचाऱ्यांचा कामबंद अंदोलनाचा 24 वा दिवस

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

**परभणी:-** मनपा कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी वेगवेगळ्या पद्धतीचे आंदोलन करूनही राज्य सरकारला त्यांच्या हक्काच्या मागण्या मान्य करण्यास विलंब लावल्यामुळे सुरू असलेल्या काम बंद आंदोलनावर यामुळे महानगरपालिका कर्मचारी आपली आंदोलन अधिक तीव्र करत 2 सप्टेंबर बुधवार रोजी महापालिका कार्यालयासमोर वसमत रोडवर रास्ता रोको आंदोलन केले आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी व सरकारचे लक्ष वेधण्यासाठी जोरदार घोषणाबाजी करत रास्ता रोको केला कर्मचारी आंदोलनाला 24 दिवस उलटूनही राज्य शासनाकडून कुठलाही तोडगा निघालेला नाही जीएसटीचे अनुदान वाढवावे फरकाची रक्कम देण्यात यावी थकीत वेतन व सेवानिवृत्ती उपदान अदा करावे या मागणीसाठी महापालिका कर्मचाऱ्यांनी 10 ऑगस्ट पासून रणसिंग फुंकले होते व काम बंद आंदोलन सुरू केले




होते या आंदोलनाचा भाग म्हणून मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्यात आले होते मनपा कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाकडे शासन लक्ष देत नसल्यामुळे व विनाकारण कर्मचाऱ्यांची त्यांच्या हक्काच्या मागणीसाठी त्यांची कुचबना सरकार करत असल्यामुळे कर्मचाऱ्यांनी तीव्र आंदोलन करण्याची भूमिका घेतली असून दिनांक 2 सप्टेंबर बुधवार रोजी मनपा कार्यालय वसमत रोड येथे रस्ता रोको आंदोलन केले आंदोलनात सहभागी कर्मचाऱ्यांनी हातात मागण्यांचे फलक घेऊन जोरदार घोषणाबाजी करत रस्ता रोको केल्यामुळे दोन्हीकडून रस्त्याच्या आजूबाजूने वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या होत्या यावेळी या कर्मचारी आंदोलनात मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी झाले होते कर्मचारी करत.



डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे व्यंगचित्र या विषयावर व्याख्यानासाठी निमंत्रण केले असता, प्रात्यक्षिक व इतर मुद्द्यावर मार्गदर्शन.

# गावपातळीवरच दर्जेदार आरोग्य सेवा देण्यावर भर; 'अधिक उपचार, कमी संदर्भ' सूत्राची प्रभावी अंमलबजावणी



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर आणि आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डॉ. संतोष कडले यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र वडोद बाजार अंतर्गत उपकेंद्र पाथरी, ता. फुलंब्री येथे 'सर्वंकष प्राथमिक आरोग्य सेवा' (सीपीएचसी) अंतर्गत दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.

डॉ. विजया सोनवणे, डॉ. रिझवान शेख, डॉ. विजय साकोलकर, डॉ. कुलकर्णी, डॉ. सुनंदा घोलप, डॉ. महेश मरकड, प्रशांत सोनटक्के, अनुसया सावरगावे, सखू शेलार, वर्षा डोंबळे, रोहित कुलकर्णी, सुनील हिवाळे आणि शिवनाथ तावडे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे, आरोग्य कर्मचाऱ्यांचे ज्ञान, कौशल्य आणि कार्यक्षमता वाढविणे हा प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश होता. गावपातळीवरच अधिकाधिक आजारांचे निदान व उपचार करून अनावश्यक रुग्ण संदर्भीकरण टाळण्यासाठी 'Resolve More, Refer Less' हे सूत्र प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन करण्यात आले. प्रशिक्षणास आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डॉ. संतोष कडले, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे आणि जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे डॉ. विखे पाटील यांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला.

# सचखंड एक्सप्रेस मध्ये 15 लाख 80 हजाराच्या दागिन्याचे चोरी

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

**परभणी:-** परभणी हे ठिकाण रेल्वेचे जंक्शन असून हैदराबाद इथून येणाऱ्या गाड्या चेन्नई येणाऱ्या गाड्या पुण्यावरून येणाऱ्या गाड्या मुंबईहून येणाऱ्या गाड्या दिल्लीवरून येणाऱ्या गाड्या अशाप्रकारे अनेक गाड्या दररोज ये जा करत असतात त्यामध्येच परभणी सारख्या ठिकाणाहून हजारो प्रवासी दररोज प्रवास करत असतात त्यामध्ये परभणी मध्ये बेरोजगारांची संख्यावाढतच चालल्याने त्यांच्या हाताला काम नसल्यामुळे एकच पर्याय आहे एक तर व्यसनाच्या आहारी जाणे किंवा दिसेल त्या वस्तू लंपास करणे असाच एक प्रकार सचखंड एक्सप्रेस नांदेड वरून अमृतसर कडे जाणारी या एक्सप्रेसने प्रवास करत असताना प्रवाशाला डोळा लागल्यानंतर सोने चांदीचे व्यापार करणारे व्यापाऱ्याची ट्रॉली बॅग चोरट्याने लंपास केली 15 लाख 80 हजार रुपयाची किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने होते ही घटना 25 ऑगस्ट रोजी परभणी रेल्वे स्थानका वरून सचखंड एक्सप्रेस निघाल्यानंतर सदरील आपली बॅग चोरी गेल्याचे व्यापाऱ्याच्या लक्षात आले याप्रकरणी लोहमार्ग पोलिसात अनोळखी चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे अधिक माहिती अशी की सचिन धर्मप्रकाश गुप्ता यांनी ही तक्रार दिली आहे सोने चांदीचे व्यापार करतात होते व्यापारासाठी 19 ऑगस्ट रोजी नांदेड येथे आले होते चांदीची खरेदी विक्री झाल्यानंतर 25 ऑगस्ट रोजी नांदेड येथून आग्रा येथे जाण्यासाठी सचखंड एक्सप्रेस मध्ये बसले होते गाडी निघाल्यानंतर त्यांना झोप लागली रेल्वे स्थानक गेल्यानंतर झोपेतून जागे झाल्यानंतर ट्रॉली बॅग

# दिशा समितीची 7 सप्टेंबरला बैठक; खासदार संदिपान भूमरे घेणार केंद्र योजनांचा आढावा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यात केंद्र शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, प्रलंबित प्रकरणे तसेच लाभार्थ्यांच्या अडचणींचा आढावा घेण्यासाठी जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची (दिशा समिती) बैठक ७ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात खासदार संदिपान भूमरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

या बैठकीस जिल्ह्यातील मंत्री, आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष, दिशा समितीचे सचिव तथा जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, महानगरपालिका आयुक्त, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह केंद्र शासनाच्या विविध योजनांशी संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी व विभागप्रमुख उपस्थित राहणार आहेत.

बैठकीत केंद्र शासनाच्या विविध कल्याणकारी आणि विकासात्मक योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ वेळेत मिळत आहे का, निधीचा योग्य विनियोग होत आहे का, लाभार्थ्यांची प्रकरणे कोणत्या कारणांमुळे प्रलंबित आहेत तसेच योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी याबाबत संबंधित विभागांकडून माहिती घेण्यात येणार आहे.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या निवडणुकीत अभाविपचा 9 पैकी 9 जागांवर विजय

## सलग तिसऱ्यांदा सर्व जागांवर विजय; विद्यार्थ्यांच्या विश्वासाला पुन्हा कौल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या (MUHS) छात्रसंघ व सिनेट निवडणुकीत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) ९ पैकी ९ जागांवर विजय मिळवत सलग तिसऱ्यांदा इतिहास रचला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी, मूलभूत सुविधांचे प्रश्न तसेच विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी सातत्याने केलेल्या कामाला या निकालातून पोचपावती मिळाल्याचा दावा अभाविपच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत केला.

सिनेटच्या निवडणुकीत लक्ष्मीकांत होनकळस मोकाशे (BHMS), आदित्य रामकिसन जायभाय (BDS) आणि शुभंकर



नितीन मनगटे (MBBS) विजयी झाले. छात्रसंघाच्या अध्यक्षपदी रोहित मधुकर माळी (BPTH), उपाध्यक्षपदी यशराज धनंजय काकड (BPTH) व मिथिलेश श्रीकृष्ण माहोरे (BAMS), सचिवपदी ज्ञानेश्वर रावसाहेब आंधळे (BHMS), तर सहसचिवपदी केशव शरद पाटील (BSc Nursing) व देवांशी प्रशांत भुराणे (BDS) यांनी विजय मिळवला.

अभाविपचे देवगिरी प्रदेश मंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे म्हणाले, "अनेक अडचणी आणि अभाविपविरोधात उभ्या करण्यात आलेल्या चुकीच्या नॅरेटिव्हनंतरही नव्या पिढीतील विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा अभाविपची निवड केली आहे. आजचा युवा जागरूक असून तो स्वतः सत्य पडताळतो आणि कामाच्या आधारावर निर्णय घेतो. ९ पैकी ९ जागांवरील हा विजय म्हणजे विद्यार्थ्यांनी अभाविपच्या कामावर आणि विचारांवर व्यक्त केलेला ठाम विश्वास आहे."

छात्रसंघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष रोहित माळी म्हणाले, "विद्यार्थ्यांनी आमच्यावर जो विश्वास ठेवला आहे, तो केवळ निवडणुकीतील विजयापुरता मर्यादित न राहता आगामी काळातील कामातून सार्थ ठरवण्याची जबाबदारी आमची आहे. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक प्रश्नाला संवेदनशीलतेने हाताळत त्यांच्या हक्कांसाठी आणि शैक्षणिक हितासाठी अधिक ताकदीने काम करण्याचा संकल्प अभाविपने केला आहे." या विजयाबद्दल सर्व विजयी उमेदवारांचे तसेच निवडणूक प्रक्रियेत परिश्रम घेणाऱ्या अभाविपच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## "शाल जोडे"





# मनोज जरांगे यांनी जिभेवर लगाम लावावा; शिवछत्रपतींच्या स्मारकासमोरील उपोषणाचे ठेवा भान - विनोद पाटील

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यभरात वातावरण तापलेले असतानाच, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक तथा याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या वक्तव्यांवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महिला दंडाधिकाऱ्यांबाबत करण्यात आलेल्या विधानावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, विनोद पाटील यांनी जरांगे यांना "आपण शिवछत्रपतींच्या स्मारकासमोर उपोषण करत असल्याचे भान ठेवून अधिक जबाबदारीने भाषा वापरली पाहिजे," असे स्पष्ट आवाहन केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून मनोज जरांगे यांचे उपोषण सुरू असून, शारीरिक थकवा आणि मानसिक चिडचिड होणे साहजिक असले, तरी संतापाच्या भरात भाषेचे भान सुटता कामा नये, असे पाटील यांनी म्हटले आहे. "महिला दंडाधिकारी असो किंवा कोणतीही महिला, त्यांच्याबाबत चुकीचे वक्तव्य करणे योग्य नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला महिलांचा सन्मान शिकवला आहे. आंदोलनाच्या गांभीर्याला साजेशी भाषा वापरण्याची गरज असून, भाषेचा मुद्दा पुढे करून मूळ आरक्षणाच्या प्रश्नाचे विषयांतर करण्याचा प्रयत्न होत असल्याने मी एक भाऊ आणि मित्र म्हणून त्यांना भाषेची काळजी घेण्याची विनंती करतो," असेही ते म्हणाले.



महिला जिल्हाधिकाऱ्यांविषयी निर्माण झालेल्या नाराजीवर बोलताना विनोद पाटील यांनी मराठा समाजाची भूमिका स्पष्ट केली. मराठा समाजाचा कोणत्याही प्रशासकीय अधिकाऱ्याविरोधात रोष नाही, असे सांगत त्यांनी अधिकाऱ्यांनी कोणताही गैरसमज करून घेऊ नये, असे आवाहन केले. महिलांचा सन्मान आणि संरक्षण ही सर्वांचीच जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

आरक्षणाचा तिढा लवकरात लवकरात सोडवण्यासाठी आता छत्रपती घराण्याने पुढाकार घ्यावा, अशी महत्त्वाची मागणी विनोद पाटील यांनी केली. खासदार उदयनराजे भोसले आणि आमदार शिवेंद्रराजे भोसले यांनी मध्यस्थी करून यावर तोडगा काढावा आणि मराठा समाजाला योग्य मार्गदर्शन करावे, असे सांगत ही लढाई हक्काच्या आरक्षणासाठी आहे, कोणाला वैयक्तिक टार्गेट करण्यासाठी नाही, असा संदेश त्यांनी दिला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर होत असलेल्या टीकेबाबतही पाटील यांनी भाष्य केले. एकनाथ शिंदे यांच्याच कार्यकाळात मराठा आरक्षणासाठी निजामकालीन नोंदी शोधण्याचे मोठे ऐतिहासिक काम झाले आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे किंवा राधाकृष्ण विखे पाटील यांच्याविरोधात मराठा समाज अजिबात नाही, असे त्यांनी ठणकावून सांगितले. आरक्षणाचा लढा मोठा असल्यामुळे आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्यांच्या प्रत्येक शब्दाचे मोठे पडसाद उमटतात. संतापाच्या भरात शब्दांची धार बोथट झाली तर मूळ लढाच भरकटण्याची दाट भीती असते. त्यामुळे विनोद पाटील यांनी दिलेला हा मोलाचा सल्ला मनोज जरांगे किती गांभीर्याने घेतात, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी




# सं पा द की य

## ब्रिक्स शिखर परिषद आणि भारताची जागतिक कूटनीतिक धुरा

नवी दिल्लीतील भव्य भारत मंडपम येथे १२ आणि १३ सप्टेंबर रोजी आयोजित होणारी १८ वी 'ब्रिक्स' (BRICS) शिखर परिषद केवळ भारतासाठीच नव्हे, तर जागतिक राजकारणाच्या दृष्टीने अत्यंत निर्णायक टप्प्यावर होत आहे. चालू वर्षी ब्रिक्सचे अध्यक्षपद भूषवणाऱ्या भारताच्या यजमानपदाखाली ही उच्चस्तरीय परिषद पार पडत असून, यात संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांच्यासह रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेशकियन यांसारखे जागतिक महासत्तेचे प्रमुख एकत्र येण्याची दाट शक्यता आहे. सध्याच्या जागतिक भू-राजकीय तणावाच्या, युद्धाच्या आणि आर्थिक अनिश्चिततेच्या वातावरणात आंतरराष्ट्रीय संबंधांना नवी दिशा देण्याचे सामर्थ्य या परिषदेत आहे. भारताने आपल्या अध्यक्षपदासाठी 'बिल्डिंग फॉर रेजिलिएन्स, इनोव्हेशन, कोऑपरेशन अँड सस्टेनेबिलिटी' (लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वतता) ही अत्यंत समर्पक थीम निश्चित केली आहे. भारताने आपल्या कार्यकाळात देशातील २५ हून अधिक शहरांमध्ये ३५० पेक्षा जास्त बैठका आयोजित करून राजकीय, सुरक्षा, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा तिन्ही स्तरांवर ब्रिक्स सहकार्याला एक नवी गती दिली आहे. ग्लोबल साऊथचा (विकसनशील देशांचा) एक प्रबळ आणि विश्वासार्ह आवाज म्हणून भारताची प्रतिमा उंचावत असताना, संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवांचा या परिषदेतील सहभाग हा बहुपक्षीय कूटनीतीमधील भारताचे स्थान अधिक बळकट करतो. दुसरीकडे, मध्य पूर्वेतील सुरू असलेला संघर्ष, स्ट्रेट ऑफ होर्मुजमधील नौवहनाचे स्वातंत्र्य आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन यांसारख्या अत्यंत संवेदनशील मुद्द्यांवर संयुक्त राष्ट्रांचे प्रमुख आणि जागतिक नेते नवी दिल्लीत आमनेसामने चर्चा करतील, तेव्हा कूटनीतीची नवी दालने खुली होऊ शकतात. पश्चिम आशियातील तणाव आणि जागतिक संघर्षांवर राजनैतिक आणि शांततापूर्ण मार्गाने तोडगा काढण्यासाठी भारत मंडपम हे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. बहुपक्षीय जागतिक व्यवस्थेत विकसनशील देशांचे हितसंबंध जपणे आणि जागतिक अर्थव्यवस्थेला स्थैर्य देणे हे या परिषदेपुढील मुख्य उद्दिष्ट आहे. मात्र, या आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडी घडत असतानाच, देशांतर्गत स्तरावर लोककल्याणकारी योजनांची आणि आरोग्य व्यवस्थेची होणारी बिकट अवस्था अंतर्मुख करायला लावणारी आहे. एका बाजूला भारत जागतिक पटलावर नेतृत्व करत असताना, आंध्र प्रदेशातील भद्राचलम येथे गोल्लागुप्पा गावात मलेरिया प्रतिबंधात्मक गोळ्यांच्या दुष्परिणामांमुळे ५३ विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करावे लागणे आणि एका ७ वर्षांच्या बालिकेचा दुर्दैवी मृत्यू होणे ही अत्यंत उद्वेगजनक घटना आहे. आरोग्य प्रशासनाचा हा निष्काळजीपणा आणि ग्रामीण आरोग्य यंत्रणेतील त्रुटी आंतरराष्ट्रीय यशाच्या पार्श्वभूमीवर गंभीर सवाल उपस्थित करतात. तसेच, प्रशासनाचा पाया मानल्या जाणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी व ग्रामसेवकांच्या प्रलंबित मागण्या आणि त्यांच्या समस्यांचा प्रश्न अजूनही बैठका आणि आश्वासनांच्या फेऱ्यात अडकलेला आहे. ग्रामीण विकासाची अंमलबजावणी करणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या मागण्या मार्गी लावणे तितकेच गरजेचे आहे. भारताने जागतिक स्तरावर 'ब्रिक्स'च्या माध्यमातून आपले नेतृत्व सिद्ध करतानाच, देशातील तळागाळातील नागरिकांचे आरोग्य, सुरक्षा आणि योग्य प्रशासकीय सोयी-सुविधा अबाधित राखण्यावरही तितकाच भर दिला पाहिजे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील कूटनीतिक यश आणि देशांतर्गत लोककल्याणकारी प्रशासनाचा समतोल साधणे हेच खऱ्या अर्थाने सशक्त राष्ट्राचे लक्षण ठरेल.

## मेरा रेशम, मेरा अभिमान–2' अभियानांतर्गत डोंगर पिंपळा येथे वैज्ञानिक–शेतकरी संवाद




हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी.

**परभणी, :** रेशीम उद्योगाच्या विकासाला चालना देणे, रेशीम उत्पादक शेतकऱ्यांच्या क्षेत्रीय अडचणी जाणून घेऊन त्यावर शास्त्रीय उपाययोजना सुचविणे तसेच आधुनिक रेशीम तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने 'मेरा रेशम मेरा अभिमान–२' अभियानांतर्गत गंगाखेड तालुक्यातील डोंगर पिंपळा येथे वैज्ञानिक–शेतकरी संवाद कार्यक्रम आज पार पडला. या कार्यक्रमास परिसरातील ४० रेशीम उत्पादक शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी वैज्ञानिक तथा संयुक्त संचालक श्री. ए. एल. जाधव, डॉ. संजोग बोकण,जिल्हा रेशीम कार्यालयाचे श्री. मिसाळ उपस्थित होते.

कार्यक्रमात रेशीम किड्यांचे शास्त्रीय संगोपन, तुती बागेचे व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, कोष उत्पादनातील अडचणी, गुणवत्तापूर्ण कोष निर्मिती, उत्पादन व उत्पादकता वाढीच्या उपाययोजना तसेच रेशीम उद्योगासाठी उपलब्ध विविध शासकीय योजनांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

केंद्रीय रेशीम मंडळ, परभणी येथील वैज्ञानिक–डी तथा संयुक्त संचालक ए. एल. जाधव यांनी रेशीम किड्यांमध्ये आढळणाऱ्या नॉन-स्पिनिंग अर्थात कोष न बनविण्याच्या समस्येची कारणे व व्यवस्थापन उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली.

कोष बांधण्याच्या अवस्थेत रेशीम किड्यांना योग्य वातावरण, पुरेशी जागा, संतुलित पोषण आणि योग्य व्यवस्थापन मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तापमान व आर्द्रतेतील असमतोल, अपुरा किंवा निकृष्ट खाद्यपुरवठा, अस्वच्छता आणि संगोपनातील त्रुटींमुळे नॉन-स्पिनिंगची समस्या उद्भवू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. योग्य वेळी माउंटेजचा वापर, संगोपनगृहाची स्वच्छता आणि किड्यांना अनुकूल सूक्ष्म वातावरण उपलब्ध करून दिल्यास नॉन-स्पिनिंगचे प्रमाण कमी करता येते. त्यातून कोषाचे उत्पादन व गुणवत्ता सुधारून शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढविता येते, असे श्री. जाधव यांनी नमूद केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील रेशीम संशोधन युनिटचे डॉ. संजोग बोकण यांनी उझी माशी व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. उझी माशीचा प्रादुर्भाव रेशीम किड्यांच्या आरोग्यासह कोष उत्पादनाचे प्रमाण व गुणवत्तेवर परिणाम करू शकतो. त्यामुळे प्रादुर्भावाची सुरुवातीच्या अवस्थेतच ओळख करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. उझी माशीचे जीवनचक्र, प्रादुर्भावाची लक्षणे, बाधित किड्यांची योग्य विल्हेवाट, जैविक नियंत्रणाच्या उपाययोजना तसेच संगोपनगृहातील स्वच्छतेचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. नियमित निरीक्षण व एकात्मिक व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब केल्यास रेशीम किड्यांचे नुकसान कमी करून गुणवत्तापूर्ण कोष उत्पादनास चालना देता येते, असे त्यांनी सांगितले. रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, अनुदान व शासकीय सहाय्याबाबत जिल्हा रेशीम कार्यालयाचे श्री. मिसाळ यांनी माहिती दिली. तुती लागवड, रेशीम किड्यांचे संगोपन, आवश्यक पायाभूत सुविधा आणि रेशीम उद्योगाच्या विस्तारासाठी उपलब्ध योजनांचा पात्र शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, पात्रता निकष आणि संबंधित विभागाशी संपर्क याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित ४० रेशीम उत्पादक शेतकऱ्यांनी नॉन-स्पिनिंगची समस्या, उझी माशीचा प्रादुर्भाव, तुती बागेचे व्यवस्थापन, रेशीम किड्यांचे संगोपन, कोष उत्पादनातील घट तसेच शासकीय योजनांशी संबंधित विविध प्रश्न तज्ज्ञांसमोर मांडले.

# आज नारळ दिवस!



नारळाचं उंच झावळीदार झाड मला फार आवडतं. वारा येताच जाहिरातीमधल्या सुंदरीप्रमाणे वाऱ्यावर साऱ्या झिपऱ्या वाऱ्याच्या दिशेने सोडून वाऱ्याच्या सोबत खोडासकट मंदमंद हालणारं झाड पाहूनच मला ते फार आनंदी वाटतं. कायम उत्साहाने सळसळत असतं. 'समुद्र आहे का कुठे जवळ' म्हणून उंच वाढून आकाशातून डोकावून बघत असतं. समुद्र किनारपट्टीला वाढणारे माड कायम नार्सिसस सारखे समुद्रात डोकावून डोकावून बघत आपलं सुंदर रुपडं न्याहाळत असतात. समुद्राच्या दिशेने वाढल्यास आपले सर्व खाली पडणारे नारळ समुद्र सुरक्षित कुठेतरी किनाऱ्याला लावेल आणि तेथे ते रुजतील, माझा वंश दूर दूर वाढेल ही सुप्त इच्छाही त्यात असते. समुद्राशी प्रेमाच्या बंधानं बांधलं गेलेलं झाड जवळ इमारत किंवा भिंत असेल तर मात्र घाबरतं आणि त्याच्यापासून दूर वाढण्याचा प्रयत्न करतं.

नारळाचे प्रकार तरी किती! बुटका नारळ, उंच नारळ, सिंगापुरी नारळ , फिलिपिनी नारळ, मलेशियन नारळ, उंच बाणवली नारळ, चेन्नगी नारळ, सनंगी नारळ, ह्या कमी की काय !----परवा मारवाड्याच्या दुकानात 'एक नारळ दे' म्हणताच तो बाहेरच्या पोऱ्याला ओरडून म्हणाला, 'एक टकला भेजो!' मी जरा सतर्कपणे येणाऱ्या टकल्याची वाट पहात असताना एक गुळगुळीत शेंडी काढलेला नारळ माझ्या पिशवीत पडला. चेन्नईहून येतानाच हे नारळ छान शेंड्या काढून आल्याने त्याचं टकला हे भन्नाट नामकरण मला पहिल्यांदा मेंदुला झिणझिण्या आणि नंतर ओठावर हसू देऊन गेलं. आता मीही परत गेले की 'एक टकला दे दो' असं म्हणताना मनातून काहीतरी गुप्त गम्मत आल्याचा आनंद अनुभवत असते. असो!

'गरुडी नारळ!' हे अजून एक नाव! महाराष्ट्रात कोकण किनारपट्टीला नारळी पौर्णिमेच्या दिवशी नारळफोडीचा अनोखा खेळ खेळला जातो. दोन व्यक्ती समोरासमोर हातात नारळ घेऊन उभ्या असतात. आपल्या हातातल्या नारळाने दुसऱ्याच्या नारळावर आघात करून दुसऱ्याचा नारळ फोडण्याची ही स्पर्धा असते. कोण जास्तीतजास्त नारळ फोडेल त्याला विजयी (नारळसम्राट) घोषित केलं जातं. ह्या स्पर्धेसाठी लागणारा नारळ चांगला टणक आणि छोटा असावा लागतो. ह्यांना 'गरुडी नारळ' म्हणतात.

'प्रसादाचा नारळ' धारण करणारं झाड बोनसाय केलेलं असतं की काय असा मला संशय आहे. इतके चिटुकले नारळ बाकी कुठेही माझ्या बघण्यात नाहीत. ते जर पोस्टाने कुठल्या देवाचा प्रसाद म्हणून येणार असले तर ते कौतुकास्पद लहान पण आतल्या खोबऱ्याच्या जाडीला महान असतात. हे नारळ कधी खराब निघत नाहीत.

'असोला' नारळ हा प्रकार घरी आल्यावर तुमची शक्तीपरीक्षा करणारा असतो. त्याला पाहूनच मी दोन पावलं मागे सरकते आणि त्याला माझ्या घराच्या दिशेने येणाऱ्या पिशवीत बसू देत नाही. अशा नारळांनी माझ्या पळ्यांचे दांडे, स्क्रू ड्रायव्हर ह्यांना कचरापेटी दाखवली आहे.

'मोहाचा नारळ' हा अजून एक प्रकार! त्याचं खोबरं, पाणी अत्यंत मधुर असतं. मोहाच्या झाडाचे नारळ लावून मोहाचे माड येत नाहीत. एखाद्या सामान्य बुद्धिमत्तेच्या, गरीबाच्या घरात एखादा विद्वान पंडित वा जगन्मान्य कलाकार जन्माला यावा त्याप्रमाणे नारळाचा आस्वाद घेतल्यावरच अरे हा मोहाचा माड आहे हे लक्षात येतं. मोहाच्या शहाळ्यातील अमृतासम पाण्याचा आस्वाद घेणे आणि त्याची गोड मलाई खाणे हा स्वर्गीय अनुभव असतो.

प्रत्येक भारतीय जन्मापासूनच नारळाच्या साथीने वाढत असतो. कुठलाही प्रसंग असो नारळ पाहिजेच ! पोटुशीची ओटी भरायला नारळ लागतोच. तिची सुखरूप सुटका होवो म्हणून अंबाबाईला नवस बोलून तुझी खणा नारळानी ओटी भरीन गं बाई म्हणतानाही नारळ सोबत असतोच. बाळंतिणीची खणानारळाने ओटी भरणं असो वा आलेल्या सवाष्णीची ओटी भरणं असो! नारळ पाहिजेच! वा आलेल्यांना 'या आता म्हणत' नारळ देणं असो. प्रसंगाच्या सुरवातीपासून शेवटपर्यंत नारळ हा अविभाज्यपणे प्रसंगाशी बांधलेला असतो.

प्रमुख पाहुण्याला स्वागतकाळी भले पुष्पगुच्छ, मेमेंटो, पुस्तके हे सर्व काही दिलं तरी शाल पांघरून हातात श्रीफळ दिले की सत्कार झाला असं वाटतं. तोच टाळ्यांचा मुहूर्त असतो.

काही देवांना नारळ फोडायला लागतो. शनी, मारुती, दत्त काय भक्ताच्या शक्तीची परीक्षा बघणारे देव आहेत की काय कोण जाणे. नवीन गाडीसमोर, नव्या नवरानवरीसमोर नारळ का फोडतात (आणि टाकूनही देतात) हे अजूनही मला कळलं नाही. दगडु हलवाईच्या गणपती सारखे श्रीमंत देव मात्र कमानीला नारळाची तोरणं बांधून आरामात लोडाला टेकून बसलेले असतात. देवांचा भक्तांना पावण्याचा रेट हा बाहेर बांधलेल्या नारळाच्या तोरणांवरून आजमावता येतो. काम सिद्धीस जाण्याची निकड लक्षात घेऊन 11 नारळाच्या तोरणापासून 111 नारळाच्या तोरणापर्यंत नवस बोलले जातात.

नारळाची चटणी, ताजा ताजा नारळ झाडावरून उतरवून त्याची केलेली सोलकढी, दडपे पोहे, ओल्या नारळाची करंजी, उकडीचे मोदक, तळलेले मोदक, रवा-नारळाचे लाडू, पोहे, खिचडी, भाज्या, आमट्या ह्यांना वरून घातलेलं ताजं खोबरं, गणपती विसर्जनाच्या दिवशी गणपतीपुढचा नारळ खोवून त्यात साखर घालून बनवलेली खिरापत ------ अजूनही बरच काही! असा नारळाच्या पदार्थांचा broad spectrum नारळदिनाच्या दिवशी जिभेवर आला नाही तर काही तरी चुकलंच म्हणायला लागेल.

अरुंधती प्रवीण दीक्षित-

# शिक्षक दिनानिमित्त एक विचार - शिक्षक आणि ग्रंथालय: एक अतूट संबंध

"ग्रंथाली वसते सरस्वती,
शिक्षकात दिसे गुरुमाऊली |
दोघांच्या या संगमातून,
ज्ञानगंगा जगी अवतरली ||"

मानवी संस्कृतीच्या आणि सभ्यतेच्या विकासामध्ये शिक्षणाला सर्वोच्च स्थान आहे. शिक्षण ही केवळ अक्षरांची ओळख नसून ती माणसाला माणूस बनवणारी एक अखंड प्रक्रिया आहे. या शिक्षण प्रक्रियेचे दोन सर्वात महत्त्वाचे आणि मजबूत आधारस्तंभ म्हणजे 'शिक्षक' आणि 'ग्रंथालय'. शिक्षक हा वर्गातील जिवंत, बोलका मार्गदर्शक असतो, तर ग्रंथालय हे शांतपणे जगातील अथांग ज्ञान स्वतःमध्ये साठवून ठेवलेले अक्षरांचे अक्षय भांडार असते.

संत कबीर म्हणतात,
"गुरु गोविंद दोऊ खड़े,
काके लागूं पाय,
बलिहारी गुरु आपने
गोविंद दियो बताय."

देवाची ओळख करून देणारा गुरु जेव्हा विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या महासागराकडे म्हणजेच ग्रंथालयाकडे नेतो, तेव्हा एका सुजाण पिढीची निर्मिती होते. म्हणूनच, शिक्षक आणि ग्रंथालय यांच्यात एक अत्यंत पवित्र, प्राचीन आणि अतूट संबंध आहे.

'शिक्षण' ही मानवी जीवनाला आकार देणारी एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे दोन मुख्य आधारस्तंभ म्हणजे 'शिक्षक' आणि 'ग्रंथालय'. शिक्षक हा वर्गातील जिवंत मार्गदर्शक असतो, तर ग्रंथालय हे शांतपणे ज्ञान देणारे अक्षरांचे भांडार असते. या दोघांचा संबंध शरीराचा आणि आत्म्याचा असल्यासारखा आहे. एकाशिवाय दुसऱ्याचे अस्तित्व अपूर्ण आहे. म्हणूनच, शिक्षक आणि ग्रंथालय यांच्यात एक अत्यंत पवित्र आणि अतूट संबंध आहे.

'ज्ञानाचा जिवंत सेतू आणि पूरक नाते' हा शिक्षक आणि ग्रंथालय यांच्यातील अतूट संबंधाचा गाभा आहे. हे नाते केवळ व्यावसायिक नसून ते मानवी प्रगतीचे आणि बौद्धिक विकासाचे एक उत्तम चक्र आहे. शिक्षक हा ग्रंथालय आणि विद्यार्थी यांच्यामधील दुवा असतो. वर्गात शिक्षक जेव्हा एखादा विषय शिकवतो, तेव्हा तो विद्यार्थ्यांना त्या ज्ञानाची फक्त ओळख करून देतो. पण त्या विषयाचे सखोल ज्ञान मिळवण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा रस्ता दाखवतो. शिक्षकाच्या प्रेरणेमुळेच ग्रंथालयातील पुस्तके खऱ्या अर्थाने जिवंत होतात, अन्यथा ती कपाटात धूळ खात पडून राहतील.

शिक्षकाचे हक्काचे व्यासपीठ - ग्रंथालय' हा विचार शिक्षकाच्या व्यावसायिक आणि बौद्धिक समृद्धीचा पाया आहे. शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना शिकवणारा घटक नाही, तर तो स्वतः आयुष्यभर शिकणारा एक अखंड विद्यार्थी असतो. या दृष्टीने ग्रंथालय हे शिक्षकाचे सर्वात महत्त्वाचे व्यासपीठ कसे ठरते, याचे सविस्तर विश्लेषण पुढील प्रमाणे -

ज्ञान अद्ययावत करण्याचे हक्काचे ठिकाण

**बदलत्या काळाशी सुसंगतता:** ज्ञान ही स्थिर गोष्ट नाही, ती सतत बदलत आणि विकसित होत असते. नवीन शोध, बदललेला इतिहास, विज्ञानातील प्रगती आणि नव्या शिक्षण पद्धती समजून घेण्यासाठी शिक्षकाला सातत्याने वाचन करावे लागते.

**अखंड विद्यार्थी वृत्ती:** ग्रंथालय हे शिक्षकाला त्याचे 'विद्यार्थीपण' जिवंत ठेवण्यास मदत करते. इथे येऊन शिक्षक स्वतःच्या विषयातील जागतिक स्तरावर होणारे बदल अभ्यासतो आणि आपले ज्ञान अद्ययावत ठेवतो.

अध्यापन दर्जेदार आणि रंजक बनवण्याचे साधन

**संदर्भांची उपलब्धता:** वर्गात फक्त पाठ्यपुस्तकातील माहिती शिकवणे रटाळ ठरू शकते. शिक्षक जेव्हा ग्रंथालयातील विविध संदर्भ ग्रंथ (Reference Books), मासिके आणि ज्ञानकोश (Encyclopedia) चाळतो, तेव्हा त्याला पाठाशी संबंधित अनेक रंजक कथा, उदाहरणे आणि ऐतिहासिक दाखले मिळतात.

**प्रभावी मांडणी:** ग्रंथालयातून मिळालेल्या या अतिरिक्त माहितीचा वापर करून शिक्षक आपले अध्यापन अधिक जिवंत, प्रभावी आणि विद्यार्थ्यांच्या मनावर ठसणारे बनवतो.

बौद्धिक शांतता आणि चिंतन भूमी

**शांत वातावरण:** शिक्षकाचे रोजचे काम धावपळीचे आणि आवाजाचे असते. याउलट, ग्रंथालयातील शांतता शिक्षकाला वैचारिक स्थैर्य देते.

**चिंतन आणि मनन:** ग्रंथालय हे केवळ पुस्तके वाचण्याची जागा नाही, तर वाचलेल्या विचारांवर शांतपणे चिंतन करण्याची भूमी आहे. इथे बसून शिक्षक आपल्या पुढील पाठांचे नियोजन करतो, कठीण संकल्पना सोप्या कशा करायच्या यावर विचार करतो आणि स्वतःचे वैचारिक



क्षितिज रुंदावतो.

संशोधक वृत्तीला चालना - एक आदर्श शिक्षक नेहमीच आपल्या विषयात काहीतरी नवीन शोधण्याचा प्रयत्न करत असतो. ग्रंथालयातील शोधनिबंध (Research Papers) आणि विद्वानांची पुस्तके शिक्षकातील संशोधकाला जागृत ठेवतात.

या व्यासपीठामुळे शिक्षक केवळ माहिती देणारा 'माहिती केंद्र' न राहता, ज्ञानाची निर्मिती करणारा 'विचारवंत' बनतो.

"जो अखंड वाचक असतो, तोच उत्तम शिक्षक होऊ शकतो." शिक्षकाला आपले ज्ञान अद्ययावत (Update) ठेवण्यासाठी सतत वाचन करावे लागते. बदलत्या काळानुसार नवीन प्रवाह समजून घेण्यासाठी ग्रंथालय हे शिक्षकाचे हक्काचे ठिकाण ठरते. ग्रंथालयातील विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके आणि वर्तमानपत्रे वाचून शिक्षक आपले अध्यापन अधिक प्रभावी, रंजक आणि दर्जेदार बनवतो.

थोडक्यात सांगायचे तर... ज्याप्रमाणे एका नटासाठी रंगमंच हे त्याचे व्यासपीठ असते, त्याचप्रमाणे एका सच्च्या शिक्षकासाठी ग्रंथालय हे त्याचे बौद्धिक व्यासपीठ असते. ग्रंथालयाच्या या व्यासपीठावर जो शिक्षक तासन् तास घालवतो, तोच शिक्षक वर्गाच्या व्यासपीठावर उभा राहून विद्यार्थ्यांच्या भविष्याला योग्य आकार देऊ शकतो

वाचन संस्कृतीचे संगोपन

आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड कमी होत चालली आहे. अशा वेळी शिक्षक आणि ग्रंथालय मिळून वाचन संस्कृती टिकवून ठेवण्याचे मोठे काम करतात. जेव्हा शिक्षक स्वतः ग्रंथालयात जाऊन अभ्यास करतो, तेव्हा त्याला पाहून विद्यार्थ्यांमध्येही वाचनाची गोडी निर्माण होते. शिक्षक विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील चांगल्या पुस्तकांची नावे सुचवतो, ज्यामुळे मुलांमध्ये अवांतर वाचनाची आणि संशोधनाची वृत्ती वाढीस लागते.

शिक्षक आणि ग्रंथालय यांच्या एकत्रित प्रयत्नांचा सर्वात मोठा आणि सकारात्मक परिणाम आहे. आजच्या डिजिटल युगात ही संस्कृती टिकवणे आणि वाढवणे हे एक मोठे आव्हान आहे, ज्यामध्ये शिक्षक आणि ग्रंथालय पालकाची भूमिका बजावतात.

डिजिटल आव्हानावर मात

**स्क्रीन कडून पुस्तकांकडे:** आजचे युग हे इंटरनेट, स्मार्टफोन आणि सोशल मीडियाचे आहे. आज माहिती एका क्लिकवर उपलब्ध आहे, परंतु त्या माहितीमध्ये 'ज्ञान' आणि 'संस्कार' असतीलच असे नाही. अशा आभासी दुनियेत विद्यार्थ्यांमधील वाचनाची एकाग्रता झपाट्याने कमी होत चालली आहे.

**रुची निर्माण करणे:** शिक्षक विद्यार्थ्यांना या डिजिटल आकर्षणातून बाहेर काढून पुस्तकांच्या सुगंधी दुनियेकडे वळवण्याचे काम करतो, तर ग्रंथालय त्यांना हवी ती पुस्तके पुरवून ही रुची कायम ठेवते.

अनुकरणातून संगोपन (कृतीतून शिक्षण)

**रोल मॉडेल म्हणून शिक्षक:** "मुले जे ऐकतात त्यापेक्षा जे पाहतात त्याचे अनुकरण लवकर करतात." जेव्हा एखादा शिक्षक स्वतः ग्रंथालयात बसून गंभीरपणे वाचन करताना दिसतो, तेव्हा विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व सांगण्याची गरज उरत नाही. शिक्षकाला वाचताना पाहून मुलांमध्येही नकळत वाचनाची गोडी आणि उत्सुकता निर्माण होते.

अभ्यासक्रमाबाहेरील अवांतर वाचनाची गोडी

**दृष्टिकोन व्यापक करणे:** वाचन संस्कृतीचे संगोपन म्हणजे केवळ परीक्षेच्या पुस्तकांचे वाचन नव्हे. शिक्षक विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील थोर पुरुषांची चरित्रे, ऐतिहासिक कादंबऱ्या, विज्ञान कथा, काव्यसंग्रह आणि वैचारिक साहित्याची पुस्तके वाचण्याची प्रेरणा देतो.

**विचारांची समृद्धी:** या अवांतर वाचनामुळे विद्यार्थ्यांची विचार करण्याची क्षमता वाढते, त्यांची संकुचित वृत्ती नष्ट होते आणि ते एका विशाल दृष्टिकोनातून जगाकडे पाहू लागतात.

उपक्रमांची जोड

शिक्षक आणि ग्रंथालय मिळून वाचन संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी शाळेत विविध उपक्रम राबवू शकतात.

**वाचन प्रेरणा दिन:** डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी (१५ ऑक्टोबर) विविध वाचन स्पर्धा आयोजित करणे.

**पुस्तक परिचय (Book Review):** शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एखाद्या चांगल्या पुस्तकाची गोष्ट सांगून ते पूर्ण वाचण्यासाठी ग्रंथालयात जाण्यास प्रोत्साहित करणे.

**ग्रंथदिंडी आणि प्रदर्शन:** पुस्तकांचे महत्त्व पटवून देण्यासाठी ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करणे.

थोडक्यात सांगायचे तर...

"पुस्तकासारखा दुसरा चांगला मित्र कोणताही नाही."

वाचन संस्कृती ही मानवी मूल्यांची जपणूक करणारी संस्कृती आहे. शिक्षक आपल्या मार्गदर्शनाने या संस्कृतीचे बीज विद्यार्थ्यांच्या मनात रोवतो आणि ग्रंथालय आपल्या अथांग पुस्तकांच्या साहाय्याने त्या बीजाचे एका मोठ्या वटवृक्षात रूपांतर करते. या दोघांच्या प्रयत्नांमुळेच येणारी पिढी सुजाण, सुसंस्कृत आणि वैचारिकदृष्ट्या समृद्ध बनते.

एकमेकांना पूरक घटक

शिक्षक आणि ग्रंथालय हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हे दोन्ही घटक स्वतंत्र वाटत असले, तरी शिक्षण प्रक्रियेत ते एकमेकांवर पूर्णपणे अवलंबून आहेत. जर शिक्षक हा ज्ञानाचा प्रकाश पसरवणारा दिवा असेल, तर ग्रंथालय हे त्या दिव्यामध्ये सतत ऊर्जा देणारे तेल आहे. ग्रंथालयाशिवाय शिक्षकाचे ज्ञान मर्यादित राहू शकते आणि शिक्षकाशिवाय ग्रंथालयातील पुस्तकांचे मूल्य विद्यार्थ्यांना समजू शकत नाही.

शिक्षक हा ज्ञानाचा 'दिवा' आहे जो आपल्या अध्यापनाने विद्यार्थ्यांच्या जीवनातील अज्ञानाचा अंधार दूर करतो आणि प्रकाशाचा मार्ग दाखवतो. ग्रंथालय हे त्या दिव्यामध्ये पडणारे 'तेल' आहे. तेलाशिवाय दिवा जळू शकत नाही आणि दिव्याशिवाय तेलाचा प्रकाश पडू शकत नाही. ग्रंथालय हे शिक्षकाच्या विचार कौशल्याला आणि ज्ञानाला सतत ऊर्जा पुरवण्याचे काम करते, ज्यामुळे शिक्षकाचा ज्ञानाचा दिवा अखंड जळत राहतो.

**ग्रंथालय हा ज्ञानाचा 'साठा' आहे:** ग्रंथालयात जगातील अथांग ज्ञान, इतिहास, विज्ञान आणि विचार पुस्तकांच्या रूपाने साठवलेले असतात. परंतु, जोपर्यंत कोणी ती पुस्तके उघडून वाचत नाही, तोपर्यंत ते ज्ञान सुप्त (निर्जीव) अवस्थेत असते.

**शिक्षक हा ज्ञानाचा 'प्रवाह' आहे:** शिक्षक त्या अथांग ज्ञानसागरातून विद्यार्थ्यांच्या वयाला आणि गरजेला साजेसे ज्ञान शोधून आणतो आणि ते सोप्या भाषेत वर्गात मांडतो. म्हणजेच, शिक्षक ग्रंथालयातील निर्जीव पुस्तकांना विद्यार्थ्यांच्या मनात 'जिवंत' करण्याचे काम करतो. साठ्याशिवाय प्रवाहाला अर्थ नाही आणि प्रवाहाशिवाय साठ्याचा उपयोग नाही.

*शिक्षकाशिवाय ग्रंथालय अपूर्ण (Library is Incomplete Without a Teacher)

शिक्षकाच्या प्रेरणेशिवाय ग्रंथालयातील कपाटे केवळ लाकडी किंवा लोखंडी सांगाडे राहतील.

ग्रंथालयात गेल्यावर "काय वाचावे आणि काय टाळावे?" असा संभ्रम विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होऊ शकतो. अशा वेळी शिक्षक कोणत्या विषयासाठी कोणते अचूक पुस्तक वापरावे, याचे बोट दाखवतो.

शिक्षकाने वर्गात जिज्ञासा निर्माण केली, तरच विद्यार्थी ग्रंथालयाची पायरी चढतात.

*ग्रंथालयाशिवाय शिक्षक अपूर्ण (Teacher is Incomplete Without a Library)

शिक्षकाचे स्वतःचे ज्ञान केवळ एका पाठ्यपुस्तकात अडकून पडू नये, यासाठी त्याला ग्रंथालयाची गरज असते.

वर्गात शिकवण्यासाठी लागणारे नवनवीन दाखले, ऐतिहासिक संदर्भ, विज्ञानातील आधुनिक शोध आणि साहित्याची माहिती शिक्षकाला ग्रंथालयातूनच मिळते.

ग्रंथालयाअभावी शिक्षकाचे अध्यापन जुनाट आणि रटाळ होऊ शकते. स्वतःला अद्ययावत (Update) ठेवण्यासाठी शिक्षकाला ग्रंथालयाचाच आश्रय घ्यावा लागतो.

थोडक्यात सांगायचे तर...

शिक्षक आणि ग्रंथालय हे शिक्षण व्यवस्थेचे असे दोन प्राण आहेत जे एकमेकांपासून वेगळे केले जाऊ शकत नाहीत. ग्रंथालय शिक्षकाच्या ज्ञानाला विस्तार देते, तर शिक्षक ग्रंथालयातील पुस्तकांना अर्थ आणि दिशा प्राप्त करून देतो. या दोघांच्या सुंदर संगमातूनच विद्यार्थ्यांचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास होतो.

थोडक्यात सांगायचे तर, शिक्षक आणि ग्रंथालय यांचा संबंध अविभाज्य आहे. आदर्श विद्यार्थी आणि सुजाण समाज घडवण्यासाठी या दोन्ही घटकांचे सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली जेव्हा विद्यार्थी ग्रंथालयातील ज्ञानाचा वापर करतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने देशाचे भविष्य उज्ज्वल होते

**- ज्ञानदेव वानखेडे**
ग्रंथपाल, महाराष्ट्र हिंदी ग्रंथालय एवं वाचनालय , छत्रपती संभाजी नगर.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# फुलंब्री नगरपंचायतीचे नगराध्यक्ष राजेंद्र ठोंबरे यांचा उद्धवसेनेला धक्का देत. काँग्रेस च्या उपनगराध्यक्ष 13 नगरसेवकांनी घेतला धनुष्यबाण हाती

हिंदू प्रकाशवार्ता/सतोष करपे

**छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी :** फुलंब्री येथील नगरपंचायतीच्या राजकारणात मंगळवारी मोठी राजकीय भूकंपाने उलथापालथ झाली. उद्धवसेनेचे नगराध्यक्ष राजेंद्र ठोंबरे यांच्यासह सात, व काँग्रेसचे चार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या एका नगरसेवकाने शिंदेसेनेत प्रवेश केला. एक स्वीकृत नगरसेवक धरू वन निवडून आलेले १२ आणि एक स्वीकृत असे एकूण १३ नगरसेवक मुंबई येथे श्रीकांत शिंदे , खासदार संदीपान भुमरे,आमदार अब्दुल सत्तार जिल्हाप्रमुख रमेश पवार यांच्या उपस्थितीत सायंकाळी सहा वाजता शिंदेसेनेत दाखल झाले. या पक्षप्रवेशामुळे फुलंब्री नगरपंचायतीतील सत्तेचे राजकीय समीकरणच बदलले आहे.

काँग्रेसच्या चार नगरसेवकांमध्ये उपनगराध्यक्ष जमीर पठाण, हिना मुद्दासर पटेल, प्रशांत नागरे आणि आरशिया रिजवान खान यांचा समावेश आहे. तर उद्धवसेनेचे नगराध्यक्ष राजेंद्र ठोंबरे यांच्यासह जावेद याकूब पठाण, मसरत जफर चिश्ती, सुशमेश राजू प्रधान, अर्चना उमेश दुतोडे, राणी पवन घोडके, सना कौसर उमर आणि शहा अनोबी यांनी शिंदेसेनेत प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या एकमेव नगरसेविका हालिमा बी. अब्दुल माजीद कुरेशी यांनीही शिंदेसेनेची वाट धरली.



दोन महिन्यांपासून पडद्यामागे हालचाली

राजेंद्र ठोंबरे यांनी समर्थक नगरसेवकांसह शिंदेसेनेत जाण्याचा निर्णय सुमारे दोन महिन्यांपूर्वी घेतल्याची चर्चा चालू होती. यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत दोन बैठका झाल्याचे सांगितले जाते. फुलंब्री शहरातील विकासकामांसाठी निधी, पाणीपुरवठा, रस्ते आणि पायाभूत सुविधांसाठी विशेष निधी मिळावा, अशा मागण्या ठोंबरे यांनी मांडल्या होत्या. त्यावर शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे समजते.

डिसेंबरमध्ये तीन; आता थेट नगरपंचायत ताब्यात!

डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या फुलंब्री नगरपंचायत निवडणुकीत शिंदेसेनेकडून तीन उमेदवार विजयी झाले होते. मात्र, त्यानंतर पक्षाचा एकही निवडून आलेला नगरसेवक नगरपंचायतीत नव्हता, अशी स्थिती होती. आता विविध पक्षांतील १३ नगरसेवकांनी शिंदेसेनेत प्रवेश केल्याने एकेकाळी मर्यादित राजकीय अस्तित्व असलेल्या शिंदेसेनेने थेट नगरपंचायतीच्या सत्ताकारणात निर्णायक स्थान मिळविले आहे. त्यामुळे 'एकही नगरसेवक नसताना नगरपंचायत ताब्यात' हा फुलंब्रीच्या राजकारणातील चर्चेचा विषय ठरला आहे.

निधीच्या आश्वासनाची चर्चा

शहरातील विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन मिळाल्याने हे पक्षांतर झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. विकासकामांसाठी सत्ताधारी गटासोबत राहणे आवश्यक असल्याचा दावा पक्षांतर करणाऱ्या नगरसेवकांकडून केला जात आहे. मात्र, एकाचवेळी १३ नगरसेवकांनी पक्ष बदलल्याने त्यांच्या निर्णयावरून शहरात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे.

काँग्रेस, उद्धवसेनेचे अस्तित्व संपुष्टात?

ठोंबरे हे उद्धवसेनेचे जिल्ह्यातील एकमेव नगराध्यक्ष असल्याने त्यांच्या पक्षांतरामुळे उद्धवसेनेला मोठा धक्का बसला आहे. त्यातच काँग्रेसच्या चार नगरसेवकांनीही शिंदेसेनेत प्रवेश केल्याने नगरपंचायतीतील काँग्रेसची ताकद संपुष्टात आल्याचे चित्र निर्माण झाले आहे. खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेससाठीही ही मोठी राजकीय पिछेहाट मानली जात आहे. आता नगरपंचायतीत शिंदेसेना आणि भाजपचे वर्चस्व निर्माण झाले आहे.

नागरिकांनाही धक्का; सोशल मीडियावर व्यंगबाण

उद्धवसेना आणि काँग्रेसच्या नगरसेवकांनी अचानक घेतलेल्या पक्षांतराच्या निर्णयामुळे शहरातील नागरिकांनाही धक्का बसला आहे.

## डाक अदालतीचे आयोजन; तक्रारी दाखल करण्याचे नागरिकांना आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

टपाल विभागाच्या विविध सेवांसंदर्भातील नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी आगामी ७ सप्टेंबर रोजी 'डाक अदालतीचे' आयोजन करण्यात आले आहे. डाक विभागाच्या सेवांबाबत ज्या तक्रारींवर मागील सहा आठवड्यांच्या आत समाधानकारक कारवाई किंवा निवारण झाले नसेल, अशा प्रलंबित तक्रारींची दखल या विशेष डाक अदालतीमध्ये घेतली जाणार आहे.

या डाक अदालतीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या संबंधित नागरिकांनी आपली डाक सेवेबाबतची तक्रार आगामी ४ सप्टेंबर रोजी सायंकाळपर्यंत प्रवर अधीक्षक, डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर या पत्त्यावर दोन प्रतिंमध्ये पाठवणे अनिवार्य आहे. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश विभागाचे प्रवर अधीक्षक डाकघर यांनी दिले आहेत.

## पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांच्या कार्यालयात मोफत नेत्र तपासणी शिबिर



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**अजिंठा प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील नागरिकांना नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांच्या कार्यालयात पाठक डोळ्यांचे हॉस्पिटल, निराला बाजार, औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात डॉ. रेश्मा औचरमल तसेच डॉ. सतीश औचरमल यांनी नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले. यावेळी दृष्टी कमी होणे, मोतीबिंदू तसेच डोळ्यांशी संबंधित विविध आजारांची तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर आवश्यक असलेल्या रुग्णांना पुढील उपचाराबाबत योग्य सल्ला देण्यात आला.

ग्रामीण भागातील नागरिकांना डोळ्यांच्या तपासणीसाठी शहरात जाण्याची गरज भासू नये आणि डोळ्यांच्या समस्या वेळीच निदर्शनास याव्यात, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या शिबिराचा ज्येष्ठ नागरिकांसह परिसरातील अनेक नागरिकांना लाभ झाला.

यावेळी डॉक्टरांनी नागरिकांना डोळ्यांची नियमित तपासणी करून घेणे आवश्यक असून, दृष्टीसंदर्भात कोणतीही समस्या जाणवल्यास दुर्लक्ष न करता तातडीने तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन केले.

या प्रसंगी पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांच्यासह डॉक्टर, आरोग्य कर्मचारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोफत नेत्र तपासणी शिबिराच्या आयोजनाबद्दल नागरिकांनी आयोजकांचे आभार मानले.

## भाई दयासिंह जयंतीनिमित्त कीर्तन, लंगर, अमृतसर येथील सेवेकरी उपस्थित



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्तपती संभाजीनगर:** भाई दयासिंह यांच्या 350 व्या जयंतीनिमित्त धावणी मोहल्ल्यातील गुरूद्वारा येथे गुरु ग्रंथसाहिब पठन तसेच दोन दिवस ईश्वरसिंग लुधियानावाले यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. बुधवारी हजारो भाविकांनी लंगरचा (महाप्रसाद) लाभ घेतला.यावेळी उस्मानपुरा ,सिंधी कॉलनी व भाई दयासिंग-भाई

धरमसिंग गुरूद्वाराच्या हजुरी यांनी कीर्तन सेवा अर्पन केली.दुपारीअरदास करण्यात आली. भाई दयासिंग व धरमसिंग हे शिखांचे दहावे गुरूगोबिंदसिंग यांचे सच्चे अनुयायी होते.शूर,पराक्रमी गुरूगोबिंदसिंग यांनी 14 लढाया लढल्या. याच काळात त्यांनी रामायण,महाभारत व श्रीमद भागवत गितेचे सर्व सामान्यांसाठी सुलभ भाषांतर केले.

धावणी मोहल्ल्यात 16 व्या शतकात खत्री वस्तीतील भागात उदासी मठ स्थापन झाला.1707 साली भाई दयासिंग भाई धरमसिंग हे अतिशय दीड महिना येथील गुरूद्वारात मुक्कामास होते. गुरूगोबिंदसिंग यांनी स्वतः फारशी भाषेतील जफरनामा औरंगजेबला अहमदनगरला 1669 ला पाठवला होता. इराणमधील शालेय अभ्यासक्रमात तो शिकवला जातो.

# खुलताबाद तालुक्यात शासकीय वाळू डेपो तात्काळ सुरू करा

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाचे वतीने निवेदन; अन्यथा तीव्र आंदोलना करणार. भालेराव

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी खुलताबाद तालुक्यात घरकुल लाभार्थी, सर्वसामान्य नागरिक तसेच बांधकाम व्यावसायिकांना शासनाच्या नियमानुसार वाळू उपलब्ध व्हावी, यासाठी तालुक्यात अधिकृत शासकीय वाळू डेपो तात्काळ सुरू करण्यात यावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत बुधवारी (ता. 2) रोजी पक्षाच्या वतीने पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार संतोष गुट्टे यांना निवेदन दिले



निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या विविध घरकुल योजना, पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना तसेच इतर शासकीय योजनांतर्गत मोठ्या प्रमाणात घरकुलांची कामे सुरू आहेत. मात्र, खुलताबाद तालुक्यात अधिकृत शासकीय वाळू डेपो उपलब्ध नसल्याने घरकुल लाभार्थी व बांधकाम व्यावसायिकांना कायदेशीर मार्गाने वाळू मिळविण्यास अडचणी निर्माण होत आहेत. (या अगोदरही तालुक्यातील काही लाभार्थ्यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री संजयजी शिरसाट . गंगापूर खुलताबाद विधानसभाचे आमदार प्रशांत बंब यांना निवेदन दिल्यानंतर त्यांनीही प्रशासनाशी पत्र व्यवहार केलेला असून लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून द्या परंतु आजपर्यंत वाळू डेपो सुरू झाला नसल्याने लाभार्थ्यात प्रशासनाच्या कारभाराविरोधात तीव्र नाराजी आहे )

शासकीय डेपो उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना खासगी विक्रेत्यांकडून चढ्या दराने वाळू खरेदी करावी लागत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. परिणामी सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडत असून, घरकुलांची बांधकामेही रखडत आहेत. वाळूच्या उपलब्धतेअभावी विकासकामांवरही त्याचा परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने ६ एप्रिल २०२५ रोजी नवीन वाळू (रेती) निर्गती धोरण-२०२५ संदर्भात शासन निर्णय जारी केला आहे. या धोरणानुसार शासनाच्या माध्यमातून नागरिकांना नियमानुसार वाळू उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे खुलताबाद तालुक्यासाठी अधिकृत शासकीय वाळू डेपो सुरू करण्याची मागणी पदाधिकाऱ्यांनी केली.

"शासकीय डेपो सुरू झाल्यास नागरिकांना रास्त दरात वाळू उपलब्ध होईल. घरकुल लाभार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबेल. शासनाच्या महसुलातही वाढ होईल," अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे. यापूर्वी अनेक नागरिकांनी तेथील प्रशासनाकडे मागणी केलेली आहे परंतु यावर कुठलीही कारवाईचा आजपर्यंत झाली नाही

याप्रकरणी तातडीने निर्णय घेऊन खुलताबाद तालुक्यात शासकीय वाळू डेपो सुरू न केल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी शासनाची व संबंधित विभागाची राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

हे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाचे खुलताबाद तालुकाध्यक्ष फकीरराव भालेराव यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध पदांवरील सदस्य उपस्थित होते. निवेदनाच्या प्रती केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा पक्षाचे राष्ट्रीय नेते रामदास आठवले, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, आमदार प्रशांत बंब, गटविकास अधिकारी, पंचायत समिती तसेच पोलीस प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

## उच्च रक्तदाब, मधुमेहासह तोंड, स्तन व गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या लवकर निदानावर भर

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी,-आरोग्याची काळजी घ्या... आजाराची वाट पाहू नका ! परभणी जिल्ह्यात ३० वर्षांवरील नागरिकांसाठी १०० दिवसांचे "तीस वर्षाचा पल्ला, तपासणी अन् सल्ला विशेष अभियान" १ सप्टेंबरपासून सुरू झाले आहे. उच्च रक्तदाब, मधुमेह आणि कर्करोगाचे लवकर निदान करून निरोगी कुटुंब, निरोगी गाव आणि आरोग्यसंपन्न परभणीचा संकल्प करण्यात आला आहे.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या मार्गदर्शनाखाली परभणी जिल्ह्यात अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. किशोर सुरवसे व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर यांच्या अधिपत्याखाली आरोग्य विभागातील अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी तसेच संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून अभियानाचे नियोजन करण्यात आले आहे. बदलती जीवनशैली, वाढता ताणतणाव तसेच अन्य कारणांमुळे नागरिकांमध्ये असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढत आहे. जिल्ह्यात तीस वर्षीवरील ११ लक्ष ६५ हजार ५२४ नागरिकांची तपासणी करण्यात येणार आहे. जिल्ह्यात सद्यस्थितीत ६१ हजार ६७२ रक्तदाब,३१ हजार ७४३ मधुमेह तसेच कर्क रुग्णांमध्ये ८९ तोंडाचा, ५६ स्तनाचे आणि ५० गर्भाशय मुख रुग्णसंख्या आहे. यांसारख्या आजारांचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान झाल्यास त्यांचे योग्यवेळी उपचाराही सुरू करता येतात.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार निरोगी महाराष्ट्राच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून जिल्ह्यात "माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियान राबविण्यात येत आहे". अभियानाच्या पुढील टप्प्यात ३० वर्षे व त्यावरील महिला व पुरुषांची आरोग्य तपासणी, निदान, उपचार तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी १ सप्टेंबर ते १० डिसेंबर, २०२६ या कालावधीत १०० दिवसांचे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. व्यवस्थापन व वेळेत उपचार करणे अधिक सुलभ होते. त्यामुळे अशा आजारांचे लवकर निदान करण्यावर या अभियानात विशेष भर देण्यात येणार आहे.

## आधार व स्वयंम योजनेच्या प्रवेश अर्जांना 15 सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृह प्रवेश योजनेपासून वंचित विद्यार्थ्यांना पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना यांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्यास १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी या योजनांसाठी ऑनलाइन प्रवेश अर्ज १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत सादर करावेत. अर्ज करण्यासाठी शासनाच्या **https:**//www.hmasnew.mahait.org या संकेतस्थळाचा वापर करावा. परभणी जिल्ह्यातील तालुक्यांच्या ठिकाणी असलेल्या महाविद्यालयांमध्ये व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना सन २०२६-२७ मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही या मुदतवाढीचा लाभ घेता येणार आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

दरम्यान, आधार व स्वयंम योजनेअंतर्गत नूतनीकरणाचे अर्ज भरण्याबाबत स्वतंत्र सूचना नंतर देण्यात येणार आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत केवळ सन २०२६-२७ मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनीच ऑनलाइन अर्ज सादर करावेत.

नवीन प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी मुदत संपण्यापूर्वी अर्ज करून योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक रामेश्वर मुंडे यांनी केले आहे.

# गणेशोत्सवासाठी 'एक खिडकी' योजना सुरु; मंडप, स्टेज आणि मूर्ती स्टॉलसाठी परवानगी अर्ज प्रक्रिया सुरु

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

महानगरपालिका क्षेत्रातील आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू करण्यात आली असून, सार्वजनिक गणेश मंडळे आणि नागरिकांच्या सुविधेसाठी महापालिकेने एक खिडकी योजना सुरू केली आहे. या अंतर्गत तात्पुरते मंडप, स्टेज तसेच श्री गणेश मूर्ती विक्रीसाठीचे स्टॉल उभारण्याच्या परवानगीची प्रक्रिया ०२ सप्टेंबर अधिकृतपणे सुरू झाली आहे.

उत्सवादरम्यान कोणत्याही प्रकारची प्रशासकीय अडचण येऊ नये आणि वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी महापालिकेने अत्यंत महत्त्वाची पावले उचलली आहेत. या सुविधेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या सर्व सार्वजनिक गणेश मंडळे आणि नागरिकांना दिनांक २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत आपले अर्ज दाखल करता येणार आहेत. अर्ज सादर करण्यापूर्वी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली 'मार्गदर्शक तत्त्वे – २०२६' काळजीपूर्वक वाचणे आणि त्यानुसारच आपला परिपूर्ण अर्ज सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

केवळ अर्ज दाखल केला म्हणजे परवानगी मिळाली असा गैरसमज मंडळे किंवा नागरिकांनी करून घेऊ नये, असा स्पष्ट इशारा महापालिकेने दिला आहे. सक्षम प्राधिकाऱ्याकडून अधिकृत परवानगी मिळाल्याचे पत्र हातात आल्यानंतरच प्रत्यक्षात मंडप किंवा स्टेज उभारणीचे काम सुरू करावे लागणार आहे. विनापरवाना मंडप किंवा स्टेज उभारल्याचे निदर्शनास आल्यास ते तात्काळ हटवले जातील आणि संबंधितांवर कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

सार्वजनिक सुरक्षेचा विचार करून मंडप किंवा स्टेजमुळे रस्त्यावरील नियमित वाहतुकीला, पादचारी मार्गांना किंवा नागरिकांच्या ये-जा करण्यास कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मंडळांची राहणार आहे. तसेच, उत्सवाच्या काळात परिसरातील रहिवाशांना त्रास होणार नाही आणि शासनाच्या ध्वनीप्रदूषणासंबंधीच्या नियमांचे काटेकोर पालन होईल, याची दक्षता घेण्याचे आवाहनही महापालिकेने केले आहे.

याच एक खिडकी योजनेच्या माध्यमातून यंदा गणेश मूर्ती विक्रीसाठी स्टॉल उभारू इच्छिणाऱ्या व्यावसायिकांनाही परवानग्या दिल्या जाणार आहेत. मूर्ती विक्रीचे स्टॉल उभारतानाही वाहतुकीला किंवा नागरिकांना कोणताही अडथळा होणार नाही, याची पूर्ण काळजी स्टॉलधारकांनी घेणे बंधनकारक आहे. गणेशोत्सव अत्यंत शांततेत, सुव्यवस्थित आणि सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व गणेश मंडळे, मूर्ती विक्रेते आणि नागरिकांनी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेला पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्तांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वैश्विक कल्याणार्थ शक्तीपीठ जोगवा यात्रा : प.पू.मकरंद वैद्य

## गुरुला दत्तात्रय नव्हे तत्व रुपात जाणा

**छत्रपती संभाजीनगर:** गुरूतत्व प्रदीप शक्तीपीठ जोगवा यात्रेचा उद्देश वैश्विक कल्याणार्थ हा असून 2026 ते 2035 या काळात जगात अनेक अरिष्ट घडण्याचा ज्योतिषकारांची भाकीते आहेत,यावर अध्यात्मिक व धार्मिक उपाय म्हणून श्री भगवतीची उपासना व दत्तभक्ती म्हणून शक्तीपीठ जोगवा यात्रा निघालेली आहे,अशी माहिती प.पू.मकरंद महाराज वैद्य यांनी दिली.



गुरुदत्त प्रदीप धाराशिव,सोलापूर,लातूर आयोजित श्री दत्त दुर्गा महाअनुष्ठाननिमित्त या यात्रेचे शहरात आगमन झाले असता त्यांनी गुरुचरित्राची मुळ शिकवण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा शक्तीपीठ जोगवा यात्रेचा उद्देश असून यात्रेचे हे चौथे वर्ष आहे.श्री गुरुदेव दत्त संप्रदायातील श्रीपाद वल्लभ,अखंडानंद स्वामी, टेंभेस्वामी यांच्या उदात्त परंपरेला नमन करत हे दत्तदुर्गा महाअनुष्ठान केले जात आहे. रशिया-युक्रेन, अमेरिका/ इस्रायल वि.इराण अशी युद्धजन्य परिस्थिती व नेपाळमधील महापूर आणि भूकंप, दुष्काळ अशा विपरीत परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी भगवंतास साकडे घातले जात आहे. या यात्रेतून जोगवा मागवून महाअनुष्ठाननिमित्त अन्नदान केले जाणार आहे.12 जिल्ह्यात भ्रमण करत 50 जण यात सहभागी झाले असल्याची माहिती त्यांनी दिली.अखंडानंद हे मुळचे कोकणातले.अहिल्यानगर,परभणी,पूर्णा,औंढानाग नाथआदी भागांत त्यांचा संचार होता.आमचे आई-वडील त्यांचे शिष्य होत.तिच परंपरा पुढे सुरू असून नाशिक,पुणे,सोलापूर येथेही ही यात्रा जाणार आहे. गुरूतत्व प्रदीप म्हणजे दत्तात्रय यांच्या मूळ शिकवणीचा प्रसार हाच आहे.

आई भगवतिची उपासना

जगातील अरिष्ट दूर व्हावे यासाठी दत्तात्रय व आई भगवतीची उपासना केली जात असून युवकांना असंस्कारापासून रोखणे,अध्यात्म व धर्माकडे डोळसपणे पाहणे त्पाचप्रमाणे श्री गुरुचरित्र ग्रंथातील आपल्याच पूर्वजांच्या कथांचा प्रचार आणि प्रसार करणे त्यास अनुसरून पिढी घडविण्यावर भर दिला जात असल्याचे वैद्य यांनी सांगितले.

## शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड यांचे निधन



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२ सप्टेंबर :** छत्रपती संभाजीनगर जिल्हाचे शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र पेलाद राठोड (वय.६०) यांचे अल्पशा आजाराने बुधवार (दि.२)सकाळी १०.३० मिनिटांनी अपोल हॉस्पिटल मुंबई येथे उपचारा दरम्यान प्राणज्योत मालवली.त्यांच्यावर गुरुवार (दि.३)सकाळी ११ वाजता सोयगाव तालुक्यातील हनुमंतखेडा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

सोयगांव तालुक्यातील हनुमंतखेडा ह्या छोट्याश्या गावात, बंजारा समाजातील गरीब कुटुंबात जन्मलेले राजेंद्र राठोड यांचे निर्भिड नेतृत्व,संघटन कौशल्याने ऐन तरुण पणात तालुक्याच्या राजकारणात आपला ठसा उमटविला. बाळासाहेबांच्या ज्वलंत हिदुत्वाने प्रेरीत होऊन त्यानी एका शिवसैनिकांपासुन सुरू केलेला प्रवास ग्रामपंचायत सदस्य, सरपंच,तालुका प्रमुख,जिल्हाप्रमुख,दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य,जिल्हा परिषद सभापती पद भुषवित जिल्ह्यातील राजकारणात त्यांनी आपला दबदबा निर्माण केला होता जिल्हा बँकेची निवडणूक संपली त्यादिवशी त्यांची तब्बेत बिघडल्यावर त्यांना मुंबई येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये दाखल करून उपचार सुरु होते परंतु त्यांनी दुर्मिळ अशा हृदयाचा आजार झाल्याने बुधवारी सकाळी दहा वाजुन ३० मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली.

त्यांच्या पश्चात आई,पत्नी,दोन मुली,एक मुलगा,सुन,दोन भाऊ,तीन बहिणी असा परिवार आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेत मतदारांच्या हक्कांचे संरक्षण करा; सुनावणीची योग्य संधी देण्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रारुप मतदार याद्यांच्या प्रसिद्धीनंतर आता जुळवणी न झालेले, विसंगती किंवा तफावत असणाऱ्या मतदार तपशिलाबाबत संबंधित प्रत्येक मतदाराला सुनावणीची पुरेशी संधी देण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले आहेत. मतदारांच्या मतदान हक्काचे काटेकोरपणे संरक्षण करावे आणि प्रक्रियेदरम्यान कोणताही पात्र मतदार यादीतून वगळला जाणार नाही, याची संपूर्ण दक्षता संबंधित यंत्रणेने घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या मतदार नोंदणी अधिकारी आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते. या महत्त्वाच्या बैठकीस अपर आयुक्त मनपा रणजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी रुपेश सिनगारे, नम्रता चाटे, डॉ. निलेश अपार, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, नीलम बाफना, डॉ. व्यंकट राठोड, अरुण जऱ्हाड यांच्यासह सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते. बैठकीत डॉ. निलेश अपार यांनी साधन व्यक्ती म्हणून काम पाहताना प्रारुप



मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर राबवावयाच्या सुनावणी प्रक्रियेसंदर्भात उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.

भारत निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमानुसार, आगामी १ ऑक्टोबर या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी दावा करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय, विद्यमान मतदार यादीत समाविष्ट असलेल्या नावाबाबत अथवा नोंदीतील तपशीलात काही तफावत असल्यास त्याविरोधात येत्या ३० सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट या कालावधीत विहित नमुन्यात दावे अथवा हरकती दाखल करता येणार आहेत. मतदार यादीत नवीन नाव समाविष्ट करायचे असल्यास नमुना क्रमांक ६, नावाच्या समावेशास हरकत घेण्यासाठी किंवा नाव वगळण्यासाठी नमुना क्रमांक ७, तर नोंदींच्या तपशीलात दुरुस्ती, बदल अथवा माहिती अद्ययावत करण्यासाठी नमुना क्रमांक ८ द्वारे अर्ज सादर करण्याचे आवाहन निवडणूक प्रशासनाकडून करण्यात आलेले आहे. हे सर्व दावे आणि हरकती संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे विहित पद्धतीने स्वीकारण्यात येणार आहेत. तसेच, प्राप्त झालेल्या दाव्यांची व हरकतींची यादी दर आठवड्याला मान्यताप्राप्त सर्व राजकीय पक्षांना उपलब्ध करून दिली जाणार असून, याविषयीची सर्व माहिती संबंधित मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयातही पाहता येईल. नागरिकांना आपल्या अर्जाची किंवा हरकतीची सद्यस्थिती संबंधित निवडणूक कार्यालयातून सहज तपासता येईल.

प्रारूप मतदार यादी प्रत्येक पात्र नागरिकाच्या लोकशाही अधिकार व मतदानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याने, नागरिकांनी आपले नाव आणि इतर तपशील स्वतः तपासणे गरजेचे आहे. पात्र असूनही मतदार यादीत नाव समाविष्ट नसल्यास त्यांनी निर्धारित कालावधीत नमुना ६ नुसार दावा दाखल करावा, तर कोणतीही आक्षेपार्ह किंवा अपात्र नोंद आढळल्यास त्याबाबत नमुना ७ द्वारे तात्काळ हरकत नोंदवावी, असे आवाहन प्रशासनाद्वारे करण्यात आले आहे. ही प्रारूप मतदार यादी संबंधित मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय तसेच संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे पाहण्यासाठी उपलब्ध ठेवण्यात आली आहे. तसेच, नागरिकांना भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत मतदार सेवा पोर्टलवरूनही आपल्या नावाची आणि तपशीलाची ऑनलाइन पडताळणी करता येणार आहे.

प्रशिक्षणादरम्यान अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, मतदार नोंदणी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांनी आक्षेप किंवा विसंगती असलेल्या प्रत्येक मतदाराशी संपर्क साधून त्यांचे योग्य समाधान करावे आणि नियमानुसार सुनावणीची प्रक्रिया पार पाडावी. सुनावणीसाठी पाठवण्यात येणारी नोटीस थेट बीएलओ मार्फत संबंधित मतदाराच्या घरी पोहोचवली जावी, तसेच सुनावणीच्या वेळी सोबत कोणती कागदपत्रे आणावीत, याची पूर्वकल्पना त्यांना देण्यात यावी, अशा सविस्तर व स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी यंत्रणेला दिल्या आहेत.

## विमानतळ परिसरात लेझर, बीम लाईट्स वापरावर बंदी

**छत्रपती संभाजीनगर :** पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर कार्यक्षेत्रात विमानतळाच्या आजुबाजुच्या परिसरात असणारे फार्म हाउस, मंगल कार्यालय येथील विवाह सोहळा तसेच अन्य सामाजिक कार्यक्रमामध्ये लेझर लाईटस, बीम लाईटसच्या वापरावर दि.४ सप्टेंबर ते २ नोव्हेंबर पर्यंतच्या कालावधीसाठी बंदी घालण्याचे आदेश पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १६३ (१) व (३) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे की, पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व फार्म हाऊस, मंगल कार्यालय, विवाह सोहळा, सामाजिक कार्यक्रम इ. च्या आयोजक, मालक यांनी लेझर लाईट्स, बीम लाईट्स याचा वापर करु नये. कारण अशा वापर केल्यामुळे पायलटच्या दृष्यात अडथळा निर्माण होऊन लँडीग व टेकऑफ करण्यापूर्वी लक्ष विचलित होऊन दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## जरांगे पाटलाच्या आंदोलनाच्या समर्थ नार्थ पाथरी येथे रास्ता रोको

### छत्रपती शिवाजी महाराज चौकात मराठा आंदोलकांनी घोषणाबाजी करत केले आंदोलन, या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

**परभणी:-** अंतरवाली सराटी येथे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेले आमरण उपोषणाच्या पाठींबा देण्यासाठी आमरण उपोषणाच्या पाचव्या दिवशी मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्या बाबत शासनाने तात्काळ निर्णय घेऊन मागण्या मान्य करण्यासाठी पाथरी शहरात 2 सप्टेंबर बुधवार रोजी सकाळी साडेदहा वाजता



रास्ता रोको आंदोलन करण्यात आले अधिक माहिती अशी की पात्री शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात राजकीय महामार्गावर मराठा आंदोलकांनी सकाळी साडेदहा वाजता रस्ता रोको आंदोलन केला यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत शासनाने संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या प्रलंबित मागण्यावर सकारात्मक भूमिका घेऊन शासनाने मागण्या मान्य कराव्यात व हैदराबाद गॅजेटनुसार कुणबी प्रमाणपत्र जात वैधता प्रमाणपत्र अण्णासाहेब पाटील विकास महामंडळातर्फे प्रलंबित व्याज परतावे अदा करणे तसेच पंजाबराव देशमुख विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना तातडीने देण्यात यावा अशा प्रमुख मागण्यांसाठी रास्ता रोको करत 548 बी आणि राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 61 वर या आंदोलनामुळे वाहनाच्या रांगाच रांगा लागल्या होत्या अशा अशा परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता या आंदोलनामध्ये सर्व पक्ष नेते कार्यकर्ते सहभागी झाले होते दरम्यान आंदोलकांकडून पोलिस अधिकारी यांना मागण्या संदर्भात निवेदन देण्यात आले चे उद्या पाथरी शहर बंदचे आव्हान करण्यात आले .

## कागदी पदव्यांपेक्षा स्वतःची क्षमता निर्माण करा

### प्रख्यात रंगकर्मी प्रा.दिलीप घारे यांचे युवा कलावंतांना आवाहन- युवक महोत्सवाचा जल्लोषात समारोप

**कळंब, दि.२ :** आयुष्याच्या प्रत्येक टप्प्याला समजून घेतले पाहिजे आणि तो मनापासून जगला पाहिजे. अन्यथा पुढे पश्चात्ताप करण्याची वेळ येते. केवळ कागदावरील क्वालिफिकेशन अर्थात पदव्या महत्त्वाच्या नसून, स्वतःमध्ये क्षमता निर्माण करून ती सातत्याने विकसित केली पाहिजे, असे प्रतिपादन प्रख्यात रंगकर्मी प्रा. दिलीप घारे यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा धाराशिव जिल्हा युवक महोत्सवाचा समारोप बुधवारी (दि. दोन) सायंकाळी थाटात करण्यात आला. जिल्हाभरातून आलेल्या युवा कलावंतांनी जल्लोषात पारितोषिके स्वीकारली. कळंब येथील ज्ञानप्रसारक मंडळ येरमाळा संचलित शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात १ व २ सप्टेंबर रोजी महोत्सव झाला. महोत्सवाचे उद्घाटन आमदार बसवराज पाटील मुरुमकर यांच्या हस्ते व कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली झाला. तर समारोप संस्थेचे उपाध्यक्ष आबासाहेब बारकुल यांच्या अध्यक्षतेखाली

सचिव डॉ.अशोकराव मोहेकर, विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ कैलास अंभुरे, प्राचार्य डॉ. हेमंत भगवान, अधिसभा सदस्य डॉ.संजय कांबळे, संयोजन समिती सदस्य डॉ.दिलीप महालिंगे, डॉ.किशोर शिरसाट, डॉ.शशिकांत पाटील, सांस्कृतिक समन्वयक डॉ दत्ता साकोळे आदींसह संयोजन समिती सदस्य उपस्थित होते. ज्ञान प्रसारक मंडळ या संस्थेचा अमृत महोत्सव आणि संस्थापक शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुजी यांची जन्मशताब्दी या अनुषंगाने युवक महोत्सवाचे यजमानपद संस्थेने घेतले आहे, असे संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ.अशोक मोहेकर म्हणाले. यानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रम, स्पर्धा व वर्षअखेरीस समारोप सोहळा होणार आहेत असे अध्यक्षीय समारोपात प्रा आबासाहेब बारकूल म्हणाले. विद्यार्थ्यांनी केवळ चांगली नोकरी मिळविण्याचे ध्येय न ठेवता एक चांगला माणूस होण्याचे ध्येय ठेवावे. ज्ञानासोबत विवेक, कौशल्यासोबत संवेदनशीलता आणि यशासोबत नम्रता जोपासावी, असा संदेशही प्रा बारकूल यांनी यांनी दिला. धाराशिव जिल्ह्यातील पारितोषिक विजेते प्रथम तीन संघाना केंद्रीय युवक महोत्सवात सहभाग मिळणार आहे. हा महोत्सव गणेश महोत्सव नंतर घेण्यात येईल. केंद्रीय युवक महोत्सव डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरामध्ये ५ ते ७ ऑक्टोबर या दरम्यान आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती संचालक डॉ कैलास अंभुरे यांनी दिली.

प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुंजीच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. या महोत्सवात जिल्हाभरातून ४४ महाविद्यालयांचे ४५७ युवा कलावंत सहभागी झाले. महाविद्यालयांच्या परिसरात चार रंगमंचावर स्पर्धा संपन्न घेण्यात आली.

## सेनगाव बाजार समितीच्या सभापतीपदी भिकाजी अवचार!

### उबाठा गटाचा झेंडा; अवचार यांची बिनविरोध निवड, बाजार समितीच्या प्रांगणात जल्लोष

**हिंगोली :** सेनगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदाची निवडणूक मंगळवारी (ता. १) पार पडली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे संचालक भिकाजी अवचार यांची सभापतीपदी बिनविरोध निवड झाली. सभापतीपदासाठी अवचार यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांच्या निवडीची औपचारिक घोषणा करण्यात आली.

बाजार समितीच्या सभागृहात विशेष सभा घेण्यात आली. सहाय्यक दुय्यम निबंधक अक्षय गुठे यांनी अध्यक्षीय अधिकारी म्हणून काम पाहिले. अवचार यांचा एकमेव अर्ज



असल्याने निवडणूक बिनविरोध झाली. गुठे यांनी अवचार यांच्या निवडीची घोषणा करताच समर्थकांनी आनंद व्यक्त केला.

बाजार समितीच्या प्रांगणात सत्कार

निवडीनंतर बाजार समितीच्या प्रांगणात नवनिर्वाचित सभापती भिकाजी अवचार यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

## प्रा.श्रीनिवास मोतीयेळे यांचे 'टायगरमॅन इंडिया ट्रायथलॉन स्पर्धेत यश

**छत्रपती संभाजीनगर, :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापक डॉ.श्रीनिवास मोतीयेळे यांनी बालेवाडी पुणे येथे पार पडलेल्या ‘टायगरमॅन इंडिया ट्रायथलॉन २०२६’ या अत्यंत आव्हानात्मक स्पर्धेत यश संपादन करून 'टायगरमॅन' हा किताब आपल्या नावावर केला आहे.

या स्पर्धेत स्प्रिंट डिस्टन्स या प्रकारात ७५० मीटर पोहणे, २० किलोमीटर सायकलिंग आणि ५ किलोमीटर धावणे असे कठीण टप्पे समाविष्ट होते. हे सर्व टप्पे डॉ.श्रीनिवास मोतीयेळे यांनी अत्यंत कौशल्याने आणि (२|४५|१६) निर्धारित वेळेत पूर्ण करत हे यश संपादन केले आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून आणि संपूर्ण भारतातून अनेक स्पर्धक विविध राज्यातून विविध वयोगटांनुसार सहभागी झाले होते. या यशाबद्दल डॉ.मोतीयेळे यांचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, विभागप्रमुख डॉ.दिनेश वंजारे, डॉ.शशिकांत




सिंग, डॉ.सदाशिव जव्हेरी, जॉय थॉमस, डॉ.रहीम खान, निलेश खरे, ओम नलावडे, ऐश्वर्या आघाव, डॉ.अमरदीप असोलकर, डॉ.भागवत वाघ, निलेश बेडके आणि लक्ष्मण सूर्यवंशी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

या स्पर्धेच्या तयारीसाठी डॉ.मोतीयेळे यांना ट्रायथलॉनचे आंतरराष्ट्रीय टेक्निकल ऑफिसर अभय देशमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यासोबतच स्पर्धेच्या ठिकाणी अभिजीत मुथा, प्रा.सागर महाजन, आकाश महाजन यांचे विशेष सहकार्य लाभले.

## तृतीयपंथीयांना कायदेविषयक हक्क व शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी जनजागृती कार्यक्रम संपन्न

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:** तृतीयपंथीयांना त्यांच्या संविधानिक व कायदेशीर हक्कांची माहिती मिळावी, तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजना व सुविधांचा त्यांना प्रभावीपणे लाभ घेता यावा, या उद्देशाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्या वतीने मंगळवारी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एम. सादरानी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

कार्यक्रमामध्ये भूषण म.



काळे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांनी तृतीयपंथीयांचे संविधानिक व कायदेशीर हक्क, त्यांना उपलब्ध असलेल्या मोफत कायदेविषयक सेवा तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत तृतीयपंथीयांसाठी उपलब्ध असलेल्या विविध कायदेविषयक सहाय्य व योजनांची सविस्तर माहिती दिली. आर्थिक अडचणींमुळे कोणतीही व्यक्ती न्यायापासून वंचित राहू नये, यासाठी विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध असलेल्या मोफत कायदेविषयक मदतीचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सुभाष मस्के, प्रकल्प अधिकारी, महानगरपालिका, परभणी यांनी महानगरपालिकेमार्फत तृतीयपंथीयांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजना, सुविधा व कल्याणकारी उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. उपलब्ध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया व संबंधित कार्यालयाशी संपर्क करण्याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

तसेच आर. एन. अकुलवार, मुख्य व्यवस्थापक, लीड बँक ऑफिस, परभणी यांनी बँकिंग क्षेत्राशी संबंधित विविध सुविधा व योजनांची माहिती दिली. तृतीयपंथीयांना बँक खाते उघडणे, आर्थिक व्यवहार, शासकीय योजनांचा लाभ थेट बँक खात्यात प्राप्त होणे तसेच बँकेमार्फत उपलब्ध विविध आर्थिक सुविधांचा लाभ घेण्याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास तृतीयपंथी समाजाच्या नेत्या अमिता मॅडम आपल्या टीमसह उपस्थित होत्या. त्यांनी तृतीयपंथी समाजासमोरील विविध समस्या, त्यांच्या गरजा तसेच शासनाच्या योजना व कायदेविषयक सुविधांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी याबाबत आपले विचार मांडले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून तृतीयपंथीयांमध्ये कायदेशीर हक्क, शासकीय योजना, सामाजिक सुरक्षा, आर्थिक स्वावलंबन आणि उपलब्ध विधी सेवा याबाबत जनजागृती करण्यात आली. विविध शासकीय यंत्रणा आणि विधी सेवा प्राधिकरण यांच्या समन्वयातून तृतीयपंथीयांना त्यांच्या हक्कांचा व शासनाच्या उपलब्ध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

## पर्यटनाला नव्हे आयाम देण्यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे; जिल्हाधिकारी विनय गौडा यांचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

जिल्ह्यातील पर्यटन क्षेत्राचा कायापालट करून त्याला नव्याने चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांचा दर्जेदार विकास, स्वच्छता राखणे, पर्यटनस्थळांची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावी प्रसिद्धी आणि शाश्वत पर्यटन व्यवस्थापनावर विशेष भर देणे गरजेचे आहे. यासाठी जिल्हा प्रशासन, पर्यटन क्षेत्राशी जोडलेले विविध भागधारक आणि संबंधित सर्व यंत्रणांनी एकमेकांशी समन्वय साधत एकत्रितपणे काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक उच्चस्तरीय पर्यटन आढावा बैठक पार पडली. या महत्त्वपूर्ण बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., सहआयुक्त रिता मेत्रेवार, अतिरिक्त जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, पोलीस उपायुक्त पंकज अतूलकर, सहायक आयुक्त सुनील सूर्यवंशी, पर्यटन संचालनालयाच्या प्रादेशिक कार्यालयाचे उपसंचालक विजय जाधव, महानगरपालिकेचे उपायुक्त अंकुश पांढरे, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे अधीक्षक पुरातत्त्वविद् अरुण मलिक यांच्यासह पर्यटन क्षेत्रातील नामवंत हितधारक श्री. राम भोगले, छत्रपती संभाजीनगर प्रमोटर गिल्डचे अध्यक्ष जसवंत सिंग, हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष हरप्रीत सिंग आणि विविध प्रशासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी गौडा यांनी



सांगितले की, शाश्वत पर्यटन ही आपली सर्वांची सामूहिक व नैतिक जबाबदारी आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ऐतिहासिक व जागतिक वारसास्थळांच्या परिसरातील पर्यटनाला अधिक गती देण्यासाठी केवळ प्रशासकीय प्रयत्न पुरेसे नसून, यात टॅक्सी-ऑटो आणि बसचालक, हॉटेल व्यावसायिक, स्थानिक विक्रेते, पर्यटन मार्गदर्शक (गाईड) तसेच इतर सर्व संबंधित घटकांचे सक्रिय सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. जिल्ह्यात येणाऱ्या देश-विदेशातील पर्यटकांना पूर्णपणे सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून दिल्यास जिल्ह्याच्या पर्यटन अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, जागतिक प्रसिद्धीचा ‘अजिंठा-वेरूळ महोत्सव’ आता दरवर्षी नियमितपणे आयोजित करण्याच्या हालचाली सुरू आहेत. याचाच एक भाग म्हणून आगामी काळात ऐतिहासिक वारसा असलेल्या वेरूळ येथे 'वेरूळ महोत्सव' आयोजित करण्याचे नियोजन प्रशासनाकडून केले जात आहे. विशेषतः परदेशी व आंतरराष्ट्रीय पर्यटकांना मोठ्या प्रमाणावर आकर्षित करण्याच्या उद्देशाने आगामी तीन वर्षांतील महोत्सवांचे अचूक वेळापत्रक आतापासूनच निश्चित करण्याचे नियोजन असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

बैठकीदरम्यान पर्यटन संस्थांचे प्रतिनिधी, हॉटेल व्यावसायिक, प्रवास संस्थांचे प्रमुख, सहलींचे आयोजक तसेच अन्य भागधारकांनी जिल्ह्यातील पर्यटन विकासाला गती देण्यासाठी आपली मोलाची मते व विविध नाविन्यपूर्ण सूचना मांडल्या. पर्यटन उपसंचालक विजय जाधव यांनीही शासकीय यंत्रणा आणि पर्यटन क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांनी परस्पर सहकार्य व उत्तम समन्वय राखत पर्यटनवाढीसाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहन यावेळी केले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911